# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-2557266

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website: rdtenagpur.org.in**


**कालमर्यादीत-**

**दिनांक- 27/02/2020 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत**

**क्र.तशिस/विकाना/शैवि-2/2020/** 778

**दिनांक:-** 26 FEB 2020

प्रति,

प्राचार्य / संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदवी,
पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय,अशासकीय अनुदानित,विनाअनुदानित तसेच तत्सम पदवी व पदविका संस्थामध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा करणे व औचित्याने विविध उपक्रम राबविणेबाबत.

संदर्भ:- मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्रं.4/आस्था/मराठी भाषादिन/2020/152, दि. 25/02/2020

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, विभागातील सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदवी,पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्थानी दिनांक 27 फेब्रुवारी 2020 हा मराठी भाषा गौरव दिन म्हणुन साजरा करण्याबाबत व या औचित्याचे शासन परीपत्रकात दिलेल्या उपक्रमाच्या सुचनेनुसार विविध उपक्रम प्रभाविपणे राविण्याकरीता आवश्यक कार्यवाही करावी व तसा अहवाल आवश्यक कागदपत्रासह त्याच दिवशी सांयकाळी 5.00 वाजेपर्यंत या कार्यालयाच्या **ronagpur@dtemaharashtra.gov.in** ईमेल वर सादर करावा.

तसेच या कार्यालयाव्दारे Share केलेली Google Sheet मध्ये (Link:- shorturl.at/dntwR) याबाबतची माहिती सांयकाळी 5.00 **वाजेपर्यंत भरण्यात यावी.**

सहपत्र:- शासन परीपत्रक

**(डॉ. राम निबुदे)**
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

C:\Users\Admin\Desktop\Diploma 123.doc

**उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये "मराठी भाषा गौरव दिन" साजरा करणे व या औचित्याने विविध उपक्रम राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक-संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१८/विशि-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २५ फेब्रुवारी, २०२०

<u>वाचा</u>:- १) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. मभादि-१०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दि. २१ जानेवारी, २०१३

२) मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:मभादि-२०२०/प्र.क्र.११/भाषा-३, दि. ४ फेब्रुवारी, २०२०

<u>परिपत्रक :-</u>

कविवर्य वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी, हा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना, संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयाद्वारे दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयास अनुसरुन, राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुखांना संदर्भ क्र. २ अन्वये "मराठी भाषा गौरव दिन" साजरा करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

या सूचनेस अनुसरुन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील, सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/ विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये, मॉडेल महाविद्यालये व परिसंस्था, कला संचालनालय व त्या अधिपत्याखालील कार्यालये तसेच तंत्र शिक्षण संचालनालय व त्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्था यामध्ये "मराठी भाषा गौरव दिन" साजरा करणे व या औचित्याने विविध उपक्रम राबविणेबाबत सूचित करण्यात येत आहे.

<u>उपक्रमांची सूची</u> :-

१. "लोक साहित्य -उत्सव मराठीचा" ही यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. लोकसाहित्याचा प्रचार व प्रसाराकरीता विविध स्पर्धा योजणे, प्रसार माध्यमातून प्रचार करणे, पुस्तके व कोश याबाबत चर्चा, परिसंवाद, व्याख्याने इ. उपक्रम योजावेत.

२. भाषा संचालनालयाचे परिभाषा कोश ( https://play.google.com /store/apps /details ? id = gov.maharashtra.shabdakoshapp) आणि मराठी विश्वकोश (https//play.google.com/ store/apps/details?id=bookganga.marathivishwakosh) आता मोबाईल ॲपवर उपलब्ध आहेत. तरी मराठी भाषा गौरव दिनाच्या औचित्याने सदर ॲपचा वापर / प्रसार होईल या दृष्टीने महाविद्यालये, विद्यार्थी, शिक्षक यांनी प्रयत्न करावेत.

३. शासनाचे मराठी शब्दकोश / शासन व्यवहार कोश व विविध परिभाषा कोश यांतील माहिती आता एकत्रितपणे https://shabdakosh.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर संकेतस्थळावरील माहिती सर्वांनी जाणून घेण्याकरीता या संकेतस्थळाला भेट द्यावी.

४. मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तीगत व समाज जीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षण शास्त्राच्या दृष्टीने महत्व या विषयांवर विचार मंथनात्मक कार्यक्रम आयोजित करावे.

५. सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर ग्रंथ प्रदर्शन / ग्रंथोत्सव / ग्रंथदिंडी आयोजित करणे.

६. महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामध्ये मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती विषयक विविध प्रकारच्या स्पर्धा (निबंध, वक्तृत्व इ.) आयोजित करणे.

७. मराठी भाषा / साहित्य /कोश वाड्मय या विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा याचे आयोजन तसेच तज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन करणे.

८. प्रसार माध्यमे तसेच प्रशासनात मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन करणे.

९. युनिकोड प्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयावरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करणे.

१०. समाज प्रसार माध्यमातील (सोशल मिडीया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे यांचे आयोजन करणे.

११. मराठी विकीपिडीयावर लेख / माहिती लिहीण्यासाठी महाविद्यालयांमध्ये कार्यशाळा भरविणे.

१२. कुसुमाग्रज व इतर सुप्रसिध्द थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करणे.

१३. दिवंगत साहित्यिकांच्या जन्मगावी / कर्मभूमी येथे स्थानिक शाळांच्या / ग्रंथालयांच्या मदतीने शाळा /ग्रंथालये / वाचनालये येथे महाविद्यालये / शिक्षण संस्था यांचेमार्फत दिवंगत साहित्यिकांचे स्मरण करुन त्यांच्या गौरवार्थ कार्यक्रमाचे आयोजन करणे.

१४. मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन करणे.

१५. बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन करणे (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे...इ.)

१६. शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती याबाबतच्या स्पर्धांचे आयोजन करणे.

१७. म्हणी, वाक्प्रचार, प्राचिन शब्द यांची व्युत्पत्ती-या विषयांवर रंजक व्याख्याने / सादरीकरणे

१८. मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन करणे.

१९. मराठी कविता, प्रसिध्द उतारे, मराठी भाषा विषयक घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन करणे.

२०. मोडी लिपीचे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन करणे.

२१. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या नि:स्पृह व्यक्तींना आणि त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

तरी, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुखांना / शैक्षणिक संस्थांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२००२२५१४४६०२४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Jakhate Kishor Mahadeo

Digitally signed by Jakhate Kishor Mahadeo
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=83112e1445917d0a21fbab36d7c0ff41e09863c93a2e62ea1b0c01da16b7a161,
serialNumber=032a6acbfd529d66dd76e26eab14b28c6dd07d2f776e529b44ba2cb45324c503, cn=Jakhate Kishor Mahadeo
Date: 2020.02.25 15:12:00 +05'30'

(कि. म. जकाते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री मराठी भाषा विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. सर्व मंत्री व राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्ष नेता विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
८. मा. विधानसभा व विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
९. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१०. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
११. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
१२. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
१३. कुलसचिव, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
१४. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
१५. कुलसचिव, सर्व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
१६. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. उप सचिव (विशि/मशि/तांशि/सांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२०. निवडनस्ती - विशि-५